गणेशोत्सवात प्लाझ्मा, लेझर वापराला बंदी

पुणे ग्रामीण पोलिसांचा महत्त्वपूर्ण निर्णय

पुणे : आगामी गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकांमध्ये प्लाझ्मा आणि लेझर किरणांच्या वापरावर पुणे ग्रामीण पोलिसांनी पूर्णपणे बंदी घातली आहे. ध्वनी आणि प्रकाश प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम लक्षात घेऊन, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचे काटेकोर पालन करण्यासाठी हा कठोर निर्णय घेण्यात आला असल्याचे पोलीस अधीक्षक संदीप गिल यांनी स्पष्ट केले आहे. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या गणेश मंडळावर पोलिसांकडून कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

पुणे जिल्ह्यात पाच हजारांहून अधिक सार्वजनिक गणेश मंडळे आणि सुमारे १ लाख ७० हजार घरगुती गणपतींची स्थापना केली जाणार आहे. या सोहळ्याचे नियोजन करण्यासाठी नुकतीच बैठक पार पडली.

ज्यात पोलीस अधीक्षक संदीप गिल यांच्यासोबत अपर पोलीस अधीक्षक शुभम कुमार आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक गणेश बिरादार प्रामुख्याने उपस्थित होते. या तयारीदरम्यान पोलिसांनी १५० प्रमुख गणेश मंडळांच्या प्रतिनिधींशी प्रत्यक्ष चर्चा करून त्यांच्या स्थानिक अडचणी व समस्या जाणून घेतल्या. या बैठकांमध्ये मंडळांच्या प्रतिनिधींनी विसर्जन मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती, सुरक्षित व खंडित न दिल्या आहेत. मिरवणुकीतील होणारा वीजपुरवठा, विसर्जन घाटावरील नदीपात्रातील पाण्याची वाढती पातळी आदी समस्या मांडल्या. या सर्व अडचणींवर संबंधित शासकीय विभागांशी तत्काळ समन्वय साधून योग्य त्या उपाययोजना केल्या जातील, असे आश्वासन पोलिसांनी दिले आहे.

पोलिसांकडून सर्व गणेश मंडळांना अत्यंत महत्त्वाच्या व संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याच्या स्पष्ट सूचना डीजेच्या वापरावर पोलिसांनी विशेष मर्यादा घातली आहे. विसर्जन मिरवणुकीत डीजेचा वापर करताना सर्वोच्च न्यायालयाच्या ध्वनिप्रदूषण नियमांचे आणि निर्धारित करण्यात आलेल्या मर्यादेच्या अधीन राहूनच आवाज ठेवावा लागेल. नियम धाब्यावर बसवून गोंगाट करणाऱ्या आणि मर्यादा ओलांडणाऱ्या मंडळांच्या विरोधात कायदेशीर गुन्हे दाखल केले जातील.

अमली पदार्थविरोधी अभियान राबवा

जिल्ह्यातील तरुण पिढीला अमली पदार्थांच्या आहारी जाण्यापासून वाचवण्यासाठी पोलिसांनी प्रत्येक गणेश मंडळाला 'से नो टू ड्रग्ज' अभियानात सहभागी होण्याचे आणि आपापल्या परिसरात जनजागृतीपर प्रदर्शन आयोजित करण्याचे आवाहन केले आहे. महिला व बालकांच्या सुरक्षेबाबत समाजात मोठ्या प्रमाणावर सतर्कता आणि जागृती निर्माण करण्यासाठी विशेष पोस्टर्स व इतर माध्यमांचा वापर केला जाणार आहे.

डीजे, डॉल्बीच्या अतिरेकी वापराला विरोध; पुण्यात आज प्रबोधन सभा

पुणे : आपला विरोध कोणत्याही सण-उत्सवाला, गणेशोत्सव मंडळांना किंवा कार्यकर्त्यांना नसून, केवळ उत्सवाच्या नावाखाली होणाऱ्या डीजे आणि डॉल्बीच्या अतिरेकी वापराला आहे, अशी स्पष्ट भूमिका पुणेकरांनी घेतली असून, या पार्श्वभूमीवर डीजे, प्लाझ्मा आणि लेझर यांसारख्या आरोग्यविघातक गोष्टींवर संपूर्ण बंदी घालण्याच्या मागणीसाठी आणि डीजेमुक्त उत्सवाचे प्रबोधन करण्यासाठी रविवारी सकाळी ११ वाजता डेक्कन येथील गुडलक चौकात एका विशेष प्रबोधन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. आयोजकांनी स्पष्ट केले की, हे कोणतेही आंदोलन किंवा मोर्चा नसून सुजाण नागरिकांची शांततापूर्ण प्रबोधन सभा आहे. या सभेचा उद्देश प्रशासनाविरुद्ध आवाज उठवणे किंवा गणेशोत्सव मंडळांशी संघर्ष करणे असा नसून, आपण सर्वजण गणपतीच्या बाजूचे आणि बुद्धीच्या देवतेच्या मार्गावर चालणारे आहोत या भावनेतून एकत्र येणे हा आहे. या सभेसाठी डेक्कन पोलिसांची अधिकृत परवानगी मिळाली असून, प्रशासनाचे आणि पोलिसांचे पूर्ण सहकार्य लाभले आहे. पुण्यातील सुसंस्कृत आणि सुजाण नागरिकांना आपल्या अत्यंत प्रामाणिक व विधायक मागणीसाठी एकत्र येण्याची ही एक महत्त्वाची संधी असल्याचे निवेदनात म्हटले गेले आहे.

विधीसंघर्षग्रस्त बालकांसाठी विशेष उपक्रम

पुणे : विधीसंघर्षग्रस्त बालकांना गुन्हेगारी प्रवृत्तीपासून दूर ठेवून त्यांच्या संवेदनशील मनावर चांगले संस्कार घडवण्यासाठी आणि त्यांना सकारात्मक जीवनाची प्रेरणा देण्यासाठी पुणे पोलिसांच्या वतीने उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पुण्यातील ५० विधीसंघर्षग्रस्त बालकांसाठी एका खास दुर्गभ्रमण, समुपदेशन आणि पुनर्वसन मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करून त्यांना ऐतिहासिक सिंहगड किल्ल्याची सफर घडवून आणण्यात आली. गुन्हेगारीचा अंधःकारमय मार्ग सोडून या मुलांनी समाजात सन्मानाचे स्थान मिळवावे.

सिंहगड विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त विजय कुंभार यांच्या देखरेखीखाली या मोहिमेचे आयोजन केले. गुन्हेगारीकडे वळणाऱ्या किंवा वळलेल्या विधीसंघर्षग्रस्त बालकांच्या विचारसरणीत सकारात्मक बदल घडवणे गरजेचे आहे.

एचडीएफसी बँकेचे सीईओ जगदीशन यांनी पुनर्नियुक्ती नाकारली

मुंबई : एचडीएफसी बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी शशिधर जगदीशन यांनी २६ ऑक्टोबर रोजी त्यांचा सध्याचा कार्यकाळ संपल्यानंतर पुनर्नियुक्तीसाठी विचार न करण्याचा निर्णय शनिवारी घेतला आहे.

एचडीएफसी बँकेने एका नियामकाला ही माहिती कळवली आहे.

जगदीशन हे बँकेत तीन दशके घालवल्यानंतर २६ ऑक्टोबर रोजी बँकेतून निवृत्त होतील. ऑक्टोबर २०२० मध्ये बँकेचे सीईओ म्हणून सूत्रे हाती घेतल्यानंतर जगदीशन हे बँकेचे प्रमुख म्हणून त्यांचा दुसरा तीन वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करत आहेत.

संचालक मंडळाने बँकेची वाढ, स्थिरता यातील त्यांचे योगदान, नेतृत्व आणि कॉर्पोरेट भारतातील सर्वात मोठ्या विलीनीकरणांपैकी एक यशस्वीपणे पूर्ण करण्यात त्यांच्या भूमिकेचे मनापासून कौतुक केले. पदभार स्वीकारल्याच्या काही महिन्यांतच बँकेने आपली मूळ गृहकर्ज कंपनी एचडीएफसीचे स्वतःमध्ये विलीनीकरण करण्याची घोषणा केली.

प्रशासकीय चिंतेचे कारण

उत्तराधिकाऱ्याची निवड वेळेत पूर्ण करू

एचडीएफसी बँकेचे संचालक मंडळ जगदीशन यांच्या जागी नवीन उत्तराधिकाऱ्याची निवड आणि नियुक्तीची प्रक्रिया 'वेळेत' वेगाने पूर्ण करेल, असे नियामकांना कळवले आहे. त्यांनी व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पुनर्नियुक्ती न घेण्याचा आपला निर्णय कळवला आहे. तसेच संचालक मंडळाने 'समजूत काढण्याचा/आग्रह करण्याचा' प्रयत्न करूनही त्यांनी आपल्या निर्णयाचा पुनरुच्चार केला, असे त्यात पुढे म्हटले आहे.

सरसंघचालक मोहन भागवत यांचे अमेरिकेत जोरदार स्वागत

न्यूयॉर्क : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या मॅडिसन स्क्वेअर गार्डन येथील भारतीय समुदायाला संबोधून होणाऱ्या भाषणापूर्वी, टाइम्स स्क्वेअरच्या मध्यवर्ती भागातील बिलबोर्ड्सवर त्यांची छायाचित्रे प्रदर्शित करण्यात आली आहेत.

आरएसएसच्या शताब्दी वर्षाच्या जागतिक संपर्क कार्यक्रमाचा भाग म्हणून भागवत मंगळवारी अमेरिकेत दाखल झाले. अमेरिकेत शनिवारी ऐतिहासिक मॅडिसन स्क्वेअर गार्डन येथे सुमारे ५,००० लोकांच्या सभेला ते संबोधित करणार आहेत. 'युनिव्हर्सल वननेस सेलिब्रेशन' नावाच्या या कार्यक्रमाचे आयोजन 'अमेरिकन हिंदूज फॉर एंगेजमेंट अँड डायलॉग' या संस्थेने केले आहे.

SBI State Bank of India

प्राधिकृत अधिकाऱ्याचा तपशील :-
नाव : राजेश कंधारकर
ई-मेल: team4.04107@sbi.co.in
मोबाईल क्र. : ९०४९७५७७००
लँडलाईन क्र. (का.) : ०२२-२२१७७६७०

स्ट्रेस्ड ॲसेट्स मॅनेजमेंट शाखा- I
शाखेचा पत्ता: दि आर्केड, २रा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५
शाखेचा ई-मेल आयडी: - sbi.04107@sbi.co.in

ई-लिलाव विक्री सूचना जोडपत्र-ए

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये बँकेकडे भारग्रस्त केलेल्या स्थावर आणि जंगम मालमत्तेची विक्री.
निम्नस्वाक्षरीकारांनी **स्टेट बँक ऑफ इंडिया**चे प्राधिकृत अधिकारी म्हणुन सरफैसी ॲक्टच्या कलम १३(४) अन्वये खालील मिळकत/तींचा कब्जा घेतला आहे.
तमाम जनतेला कळविण्यात येते की, बँकेच्या थकीत रकमांची रोकड करण्यासाठी खालील प्रकरणातील खाली वर्णन केलेल्या भाग्रस्त मिळकती/तींचा ई-लिलाव (सरफैसी ॲक्ट, २००२ अंतर्गत) **''जे आहे जेथे आहे तत्त्वाने** आणि **जे आहे जसे आहे तत्त्वाने''** करण्यात येईल.

कर्जदारांचे नाव:- मारुती स्ट्रिप्स ॲण्ड फेरो अलॉयज प्रा. लि. डी-५४४, ५ वा मजला, ७ मोलेडाईन रोड, पुणे ४११००१.

हमीदार(रां)चे नाव श्री. योगेश सारस्वते (हमीदार) - २४/२५ एम्प्रेस गार्डन व्ह्यु, को-ऑप हाऊ लि., सोपान बाग, वानवाडी, पुणे ४११०४०
श्री. शैलेश सारस्वते (हमीदार) - २४/२५ एम्प्रेस गार्डन व्ह्यु, को-ऑप हाऊ लि., सोपान बाग, वानवाडी, पुणे ४११०४०
मे. वेदांत स्पेस प्रा. लि. (कॉर्पोरेट हमीदार)- ऑफिस क्र. ५३१, क्लोव्हर सेंटर, मोलेडिना रोड, पुणे ४११००१
मे. कनक वास्तू रचना प्रा. लि. (कॉर्पोरेट हमीदार)- डी ५३१, ५ वा मजला, क्लोवर सेंटर ९, मोलेडिना रोड, पुणे ४११००१

जिच्या वसुलीकरिता मिळकती विकल्या जाणार आहेत ती थकबाकी रक्कम (i) ३०.०४.२०१६ रोजीस रु. ३१,३३,५३,३१७.२१ (रुपये एकतीस करोड तेहेतीस लाख त्रेपन्न हजार तीनशे सतरा आणि पैसे एकवीस मात्र) + पुढील व्याज आणि परिव्यय वजा वसुली काही असल्यास. सरफैसी ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अन्वये मागणी सूचना दिनांक १२.०५.२०१६.
(ii) ३०.०५.२०१६ रोजीस रु. ३७,१९,८२,८७२.५६ (रुपये सदतीस करोड एकोणीस लाख ब्याऐंशी हजार आठशे बहात्तर आणि पैसे छपन्न मात्र) + पुढील व्याज आणि परिव्यय वजा वसुली काही असल्यास. सरफैसी ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अन्वये मागणी सूचना दिनांक २५.०७.२०१६
एकूण थकबाकी देय (i आणि ii) : रु. ६८,५३,३६,१८९.७७ (रुपये अडुसष्ट करोड त्रेपन्न लाख छत्तीस हजार एकशे एकोणनव्वद आणि पैसे सत्त्याहत्तर मात्र) + पुढील व्याज आणि परिव्यय वजा वसुली काही असल्यास.

मालक/नामाधिकार विलेखधारकाचे नाव १. मे. वेदांत स्पेस प्रा. लि. (कॉर्पोरेट हमीदार)- ऑफिस क्र. ५३१, क्लोव्हर सेंटर, मोलेडिना रोड, पुणे ४११००१
२. मे. कनक वास्तू रचना प्रा. लि. (कॉर्पोरेट हमीदार)- डी ५३१, ५ वा मजला, क्लोवर सेंटर ९, मोलेडिना रोड, पुणे ४११००१

मिळकतीचे वर्णन संच क्र. १: गाव पिरंगुट, तालूका मुळशी , जि. पुणे येथे स्थित गट क्र. १०४१/१ (जुना गट क्र. ४६४), मोज. ००एच-७७आर, गट क्र. १०४१/२ (जुना गट क्र. ४६३) मोज. ००एच-३२आर आणि गट क्र. १०४२ (जुना गट क्र. ४६३), मोज. ००एच-८९आर
मिळकत वेदांत स्पेस प्रा. लि. (कॉर्पोरेट हमीदार) यांच्या मालकीचे
संच क्र. २: गाव पिरंगुट, तालूका मुळशी , जि. पुणे येथे जमीन/मिळकत मोजमापित ०२ हेक्टर ८० आरेज एकूण क्षेत्र अपिकी, वेंडर द्वारे मालकीची, मोजमापित ५ हेक्टर ७५ आरेज गट क्र. १०४० (जुना गट क्र. ४६५) एकूण मोजमापित ०६एच ४७आर चे सर्व ते भाग आणि विभाग.
मिळकत मे. कनक वास्तू रचना प्रा. लि. (कॉर्पोरेट हमीदार) यांच्या मालकीचे

राखीव किंमत (रा.किं.) संच क्र. १: रु. ११,१४,००,०००/- **संच क्र. २:** रु. १,७५,५०,०००/-

इसारा अनामत रक्कम (इअर) संच क्र. १: रु. १,११,४०,०००/- **संच क्र. २:** रु. १,५७,५०,०००/-

च्या पटीत बोली वाढविण्याची रक्कम बोली वाढविण्याची रक्कम रु. २,००,०००/-

निरीक्षणाची तारीख आणि वेळ निरिक्षण ०७.०९.२०२६ रोजी दु. ०२.०० ते सायं. ०४.००

ई-लिलावाची तारीख आणि वेळ ई-लिलाव १७.०९.२०२६ रोजी स. ११.०० ते दु. ०३.००

सहभागी होण्यासाठी विनंतीपत्र/ केवायसी दस्तावेज/ इअरचा पुरावा इ. सादर करण्याची तारीख आणि वेळ ऑनलाईन सादरीकरीता ई-लिलाव साईट https://baanknet.com

ई-लिलाव ''जे आहे जेथे आहे'' आणि ''जे आहे जसे आहे तत्त्वाने'' करण्यात येईल आणि तो ''ऑनलाईन'' करण्यात येईल. पीएसबी अलायन्स मार्फत लिलाव वेबपोर्टल (**https://baanknet.com**) येथे करण्यात येईल.
मालमत्तेच्या संबंधित विचारणांसाठी कृपया संपर्क करा - श्री. राजेश कंधारकर, मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी, मोबाईल क्र. ९०४९७५७७००. अरविंद कौशिक ६२०१३१६०७१
ऑनलाईन ई-लिलाव बोली प्रपत्र, घोषणा, ऑनलाईन लिलाव विक्रीच्या सर्वसाधारण अटी आणि शर्ती समाविष्ट ई-लिलाव निविदा दस्तावेज वेबसाईट : (**https://baanknet.com**) वर उपलब्ध आहेत.
प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम माहिती आणि समजुतीप्रमाणे मिळकती/तींवर कोणतेही भार नाहीत.
तथापि, इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी लिलावात ठेवलेल्या मिळकती/तींचे भार, हक्क आणि मिळकतीस बाधा आणणाऱ्या दावे/अधिकार/देणी याबाबत स्वतः स्वतंत्र चौकशी करावी.
- बोली सादर करण्यापूर्वी वैधानिक देय आणि तपशीलांसह सुरक्षित मालमत्तेचे भार, लिलावात ठेवलेल्या मालमत्तेचे शीर्षक आणि सुरक्षित मालमत्तेवर परिणाम करणारे दावे/हक्क/देय यांची तपासणी करणे, सत्यापित करणे आणि स्वतःचे समाधान करणे ही इच्छूक बोलीदारांची एकमात्र जबाबदारी असेल.
- वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित झालेल्या ई-लिलावाच्या सूचनेमध्ये नमूद केलेले तपशील अधोस्वाक्षरी केलेल्या अधिकृत अधिकऱ्याच्या सर्वोत्तम माहितीसाठी सांगण्यात आले आहेत; तथापि, कोणत्याही त्रुटी, चुकीचे विधान किंवा वगळण्यासाठी अधोस्वाक्षरीदार जबाबदार / उत्तरदायी असणार नाही.
- यशस्वी खरेदीदार/बिडरने कोणतीही वैधानिक देय, कर, देय शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, सोसायटी देय, सुरक्षित मालमत्तेसाठी कोणतीही न भरलेली थकबाकी इत्यादि मालमत्तेची माहिती देण्यासाठी/वितरित करण्यासाठी लागू कायद्यानुसार त्याच्या/तिच्या/त्याच्या बाजूने भरावे लागणार आहे.
- सर्व वैधानिक/गैर-वैधानिक देय, कर, दर, मूल्यांकन, शुल्क, शुल्क इ. कोणाचीही देय देणे ही केवळ यशस्वी बोलीदाराचीच जबाबदारी असेल.
- यशस्वी खरेदीदार/बिडर लागू कायद्यानुसार त्याच्या/तिच्या नावे मालमत्तेची माहिती देण्यासाठी सहकारी संस्था/अधिकारी यांना देय असलेल्या कोणत्याही खर्च/खर्च/शुल्क/शुल्क इ.साठी पूर्णपणे जबाबदार असेल.

ई-लिलावाची जाहिरात म्हणजे बँकेकडून कोणतेही वचन किंवा कोणतेही अभिवेदन दिले असे नाही व तसे समजू नये. बँकेला ज्ञात किंवा अज्ञात सध्याच्या आणि भविष्यातील सर्व भारांसह मिळकत विकली जाणार आहे. प्राधिकृत अधिकारी/तारण धनको हे कोणत्याही त्रयस्थ पक्षकारांच्या दावे/अधिकार/थकबाकीसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. विक्री सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत विहित अटी/नियमांच्या अधीन होईल.ई-लिलावाच्या इतर अटी आणि शर्ती खालील वेबसाईटस् वर प्रकाशित केल्या आहेत.
१. https://baanknet.com, २. https://bank.sbi

सही/-
दिनांक : २९.०८.२०२६ **प्राधिकृत अधिकारी,**
ठिकाण : मुंबई **स्टेट बँक ऑफ इंडिया**

आसल गावातील स्मशानभूमीची दुरवस्था

कर्जत : कर्जत तालुक्यातील आसल गावातील स्मशानभूमीची सध्या अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, परिसरातील समस्या तातडीने दूर करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

स्मशानभूमीची संरक्षक भिंत तुटली असून शेडचीही पडझड झाली आहे. अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे. पावसाळ्यात परिसरात चिखल आणि उंच गवत वाढल्याने नागरिकांना अंत्यविधीच्या वेळी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या समस्यांबाबत स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे अनेक वेळा पाठपुरावा केला आहे. मात्र,



अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे अंत्यविधीसारख्या संवेदनशील प्रसंगीही ग्रामस्थांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते सचिन गायकवाड यांनी पंचायत समिती कर्जतच्या सभापतींकडे निवेदन देऊन स्मशानभूमीची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्तीच्या कामांसाठी निधी मंजूर करण्याची मागणी केली आहे.

संरक्षक भिंत व शेडची दुरुस्ती, पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था आणि परिसराची स्वच्छता या सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी ग्रामस्थ आप्पुराज गायकवाड यांनी केली आहे.

'बदलाव जरुरी है' रॅलीसाठी शेकडो कार्यकर्ते दिल्लीला रवाना

छत्रपती संभाजीनगर : भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (भाकप) वतीने केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात १ सप्टेंबर २०२६ रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर 'बदलाव जरुरी है' या घोषणेअंतर्गत विराट रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

'जनतेसाठी, भविष्यासाठी' या घोषवाक्याखाली होणाऱ्या या आंदोलनासाठी छत्रपती संभाजीनगर शहरासह सिल्लोड, गंगापूर आणि फुलंब्री तालुक्यांतून शेकडो कार्यकर्ते दिल्लीला रवाना झाले आहेत.

महागाईला आळा घालणे, युवकांना रोजगाराची हमी देणे, सार्वजनिक आरोग्य व शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम करणे, महिला आरक्षणाची तातडीने अंमलबजावणी करणे, शेतमालाला किमान आधारभूत किमतीची (एमएसपी) कायदेशीर हमी देणे, कामगारांचे हक्क सुरक्षित ठेवणे, ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घेणे तसेच दलित-आदिवासींवरील अत्याचार व विस्थापन थांबवून न्याय देणे, अशा प्रमुख मागण्या रॅलीत मांडण्यात येणार आहेत.

या रॅलीत देशभरातून लाखो कार्यकर्ते सहभागी होणार असल्याचा दावा भाकपकडून करण्यात आला आहे.

केंद्र सरकारच्या धोरणांमध्ये बदल घडवून आणण्यासाठी व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

भाकप तथा एआयडीआरएम केंद्रीय समिती सदस्य कॉ. मधुकर खिल्लारे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्ते दिल्लीकडे रवाना झाले.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, गांव मौजे **कोशिंबे,** ता.वसई, जि.पालघर, येथील **भुमापन क्रमांक व उपविभाग ८६/५, क्षेत्र ०.३३.४० हे.आर., आकार ५.७५ रू.पै. यापैकी क्षेत्र ०.०८.४० हे.आर., आकार १.७५ रू.पै.** ही जमिन मिळकत **श्री. मनोज बाळकृष्ण भगत व इतर** यांच्या सामाईक मालकीची व कब्जेवहिवाटीची आहे. सदर जमिन मिळकत आमचे अशिलांना विकत घ्यावयाची असून तसा व्यवहार चालु आहे. तरी सदर जमिन मिळकतीवर कोणाचाही तारण, गहाण, दान, अदलाबदली, प्रीएमशन हक्क, वारसा, बक्षीस, भाडेपट्टा, लीज, विक्री, साठेकरार वा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हरकत किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी खालील पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत पुराव्यांसह लेखी हरकत घ्यावी; अन्यथा कोणाचा कोणताही हक्क नाही व असल्यास सदरचा हक्क त्यांनी सोडून दिलेला आहे असे गृहित धरून पुढील व्यवहार केले जातील आणि नंतर आलेल्या हरकतींची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

खरेदीदाराचे वकील
ॲड. पूनम मारणे,
पत्ता : फ्लॅट नं.१०३, पहिला मजला, 'ए' विंग, यशवंत प्राईड, वसई कोर्टाच्या समोर, वसई (प.), ता.वसई, जि.पालघर - ४०१२०१.

मंगला एक्स्प्रेसमध्ये २५ विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली

जळगाव : दिल्लीहून त्रिचूर येथे शैक्षणिक सहलीसाठी निघालेल्या काही विद्यार्थ्यांनी भोपाळ रेल्वे स्थानकावर जेवण घेतल्यानंतर २५ ते ३० जणांची प्रकृती बिघडली. यातील ५ ते ६ विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर आहे.

त्यांच्यासोबत डॉक्टरांचे पथक सोबत दिले आहे. ही घटना रेल्वे प्रशासनास कळताच रेल्वे

प्रशासनाने भुसावळ स्थानकावर वैदयकीय पथक तैनात करत त्यांना वैदयकीय उपचार व आवश्यक ती औषधे दिली जेवणातून विषबाधा झाली असण्याचा संशय व्यक्त केला आहे.

दिल्लीहून त्रिचूर येथे शैक्षणि सहलीसाठी एकूण ९३ विद्यार्थी व १२ शिक्षक मंगला एक्स्प्रेसने निघाले आहेत. यातील २५ ते ३० विद्यार्थ्यांनी भोपाळ रेल्वे स्टेशनवर जेवण घेतले. त्यांना उलटी व मळमळचा त्रास सुरू झाला.

'समृद्धी' महामार्गावर वकिलाला लुटले

१८ लाखांचे सोन्याचे दागिने, रोकड पळवली

लासलगाव : नाशिक जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर ११ ते १२ अनोळखी पुरुषांच्या टोळीने एका वकिलाची कार जबरदस्तीने थांबवून, त्याला आणि त्याच्या कुटुंबाला मारहाण करत १८.०९ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने आणि रोकड लुटल्याची घटना समोर आली आहे, अशी माहिती पोलिसांनी शनिवारी दिली.

ही घटना गुरुवारी रात्री सिन्नर तालुक्यातील माळढोण शिवाराजवळ घडली. राजेंद्र प्रसाद मिश्रा (३७), त्यांची पत्नी, भाऊ

आणि दीड वर्षाचा मुलगा त्यांच्या कारने छत्रपती संभाजीनगरकडून मुंबईच्या दिशेने जात होते.

दरोडेखोरांच्या टोळीने गाडीसमोर एक लोखंडी वस्तू फेकली. ज्यामुळे कारचा पुढील टायर फुटला. दरोडेखोरांनी कारला घेराव घातला.

श्री नारायणा गुरु को-ऑपरेटिव्ह बँक लि.
मुख्य कार्यालय: श्री नारायणा नगर, पी. एल. लोखंडे मार्ग, चेंबूर पश्चिम, मुंबई - ४०० ०८९. **मोबाईल क्र.:** ८४५१९१०५०६ **ई-मेल:** headoffice@sngc.bank.in

वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना
२६ वा वार्षिक अहवाल २०२५-२६

याद्वारे सूचना देण्यात येते की, श्री नारायणा गुरु को-ऑपरेटिव्ह बँक लि.च्या सदस्यांची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक २० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता, श्री नारायणा गुरु हायस्कूल कॉम्प्लेक्स, १ ला मजला, सेमिनार हॉल, पी. एल. लोखंडे मार्ग, चेंबूर, मुंबई-४०००८९ येथे खालील कामकाज पार पाडण्यासाठी आयोजित करण्यात येईल:
१. दिनांक २७ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचणे आणि त्यास मंजुरी देणे.
२. दिनांक ३१ मार्च २०२६ रोजीची लेखापरीक्षित ताळेबंद पत्रिका आणि दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी समाप्त झालेल्या वर्षाचे नफा आणि तोटा खाते यांसह वार्षिक अहवाल व संचालकांचा अहवाल विचारात घेणे आणि स्वीकारणे (सूचना www.sngc.bank.in या वेबसाइटवर अपलोड करण्यात आली आहे).
३. दिनांक ३१.०३.२०२६ रोजी समाप्त झालेल्या आर्थिक वर्षासाठी मेसर्स एच एम गोशेर अँड कंपनी (चार्टर्ड अकाउंटंट्स) यांचा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल विचारात घेणे आणि स्वीकारणे.
४. मुंबई हे महानगरीय शहर असल्यामुळे आर्थिक वर्ष २०२५-२०२६ साठी आर्थिक विवरणपत्रांसह वैधानिक लेखापरीक्षण अहवाल इंग्रजी मजकुरात सादर करण्यास मान्यता देणे.
५. मुंबई हे महानगरीय शहर असल्यामुळे आर्थिक वर्ष २०२५-२०२६ साठी दिनांक ३१ मार्च २०२६ रोजीची लेखापरीक्षित ताळेबंद पत्रिका आणि नफा व तोटा खाते यांसह आर्थिक विवरणपत्रे इंग्रजी मजकुरात सादर करण्याच्या संचालक मंडळाच्या शिफारशींना मंजुरी देणे.
६. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी स्वतंत्र लेखापरीक्षकाच्या अहवालास (दिनांक २५.०६.२०२६) मंजुरी देणे.
७. उपविधींमध्ये सुधारणा करण्याबाबत संचालक मंडळाच्या शिफारशीचा विचार करणे आणि ती स्वीकारणे.
८. वार्षिक अहवाल आणि लेखा विवरणपत्राबाबतच्या शंका आणि सूचना सभेच्या किमान ५ कामकाजाच्या दिवसांपूर्वी बँकेकडे लेखी स्वरूपात पाठवाव्यात.
९. आर्थिक वर्ष २०२६-२०२७ साठी बँकेच्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या पुनर्नियुक्तीची आरबीआयकडे शिफारस करण्याच्या संचालक मंडळाच्या निर्णयास मान्यता देणे.
१०. बँकेच्या ज्या सदस्यांनी या २६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थिती दर्शविलेली नाही, अशा सदस्यांची अनुपस्थिती माफ करणे.
११. सभेच्या अध्यक्षांच्या परवानगीने अन्य कोणत्याही विषयावर विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
सही/-
स्थळ: मुंबई **सुरेश शिवन्ना सालियन**
दिनांक: ३०.०७.२०२६ **मुख्य कार्यकारी अधिकारी**

सदस्यांसाठी महत्त्वाच्या टीपा
१. नियोजित दिनांक आणि वेळी सभेसाठी आवश्यक गणपूर्ती नसल्यास, सभा अर्ध्या तासासाठी तहकूब करण्यात येईल आणि त्यानंतर गणपूर्तीची पर्वा न करता त्याच ठिकाणी तहकूब सभा तत्काळ घेण्यात येईल.
२. असे निदर्शनास आले आहे की, बँकेच्या अनेक संस्थापक सदस्यांनी त्यांचा सध्याचा पत्ता आणि संपर्क तपशील बँकेकडे अद्ययावत केलेला नाही. त्यामुळे अनेक सदस्यांना आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी घोषित केलेला लाभांश प्राप्त करता येत नाही. पुन्हा एकदा बँकेच्या वतीने सदस्यांना **shares@sngc.bank.in** या ई-मेलवर किंवा मोबाईल क्र. ९८२०७८५१०४ वर त्वरित संपर्क साधण्याची विनंती करण्यात येते. आपल्या सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा आहे.

SBI State Bank of India
एचएलसी बोरिवली पश्चिम (१५५४५):- एलिगंट कॉर्नर, गुरू तपस्या सीएचएस लि., ६२०/४, न्यू सुवर्णा हॉस्पिटल, कस्तुर पार्क, शिंपोली रोड, बोरिवली पश्चिम, मुंबई-४०००९२, टेलि: ०२२-२९६८७५२८/५२७ **ईमेल:** racpc.borivali@sbi.co.in

स्थावर मिळकतींच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना

**सिक्युरिटायझे